# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/11/2021 (सोमवार)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
## पोलिस स्टेशन काटोल ची कार्यवाही

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 4 कि. मी. अंतरावरील पारडसिंगा रोडवर काही अंतरावर श्री साई टायर वर्कस जवळ काटोल येथे दिनांक 20/11/2021 रोजी अवैधरित्या रेती वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध 2 केसेस काण्यात आल्या आहे. फिर्यादी नामे–पो.शि. रोशन ढोकणे व पोशि चेतन ठाकरे हे वाहतुक केसेस करीत असतांना घटनास्थळी एमएच–40/ बीजी– 8879 क्रमांकाचा ट्रक व एमएच– 40/ बीजी– 3223 क्रमांकाचा ट्रक ला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता आरोपी क्र. 1 चालक नामे– ओमेश्वर गणपतराव खंडाते, वय 25 वर्ष, रा. रोहणा ता. नरखेड आरोपी क्र. 2. ट्रक मालक नामे– ज्ञानेश्वर उर्फ नितेश पूरूषोत्तम बांबल, वय 25 वर्ष, रा. रोहणा ता. नरखेड, आरोपी क्र. 3 चालक नामे– आशिष दुधराम शेंडे, वय 27 वर्ष, रा. आयटीआय कॉलेज जवळ काटोल व आरोपी क्र. 4. ट्रक मालक नामे– प्रमोद गुलाबराव ठोंबरे, रा. पंचवटी काटोल यांच्या ताब्यातुन एकुण दोन्ही वाहनामधुन 12 ब्रास रेती किं. 60,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण कि. 36,60,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द अप क्र. 604/2021 व अप क्र. 605/2021 कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री लभाणे मो नं 9823433863 हे करीत आहे.

सदर कार्यवाही श्री. विजयकुमार मगर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, श्री. राहुल माकणीकर अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. आचरेकर, सपोनि श्री लभाणे, पोलीस उपनिरीक्षक श्री. आगासे, पोलीस शिपाई रोशन ढोकणे, चेतन ठाकरे, विवके गाढवे, आगरकर व चापोशि पंकज डहाके यांनी पार पाडली आहे.

## चोरी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील अजनी येथे दि. 21/11/2021 चे 07.30 वा. दरम्यान आरोपी नामे– जगदिश परसराम हाकंदे, रा. अजनी(शेरडी), ता. सावनेर याने फिर्यादी नामे– राजेन्द्र वामनराव हाकंदे वय 43 वर्ष रा. अजनी (शेरडी), ता. सावनेर यांचे घराचे मागिल उघडया दरवाज्यातुन घरात प्रवेश करुन बेडरुम मधील लोखंडी आलमारीतील 10,000/–रू. रोख चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राजेश हावरे मो.नं. 9923365622 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. बोरी :– दिनांक 21/11/2021 चे 13.00 वा. ते 13.10 वा. दरम्यान वय 35 वर्ष फिर्यादी/पीडित हिचे घरासमोर आरोपी नामे– अक्षय रमेश कुळमते, वय 48 वर्ष, रा. जुनी वस्ती, बोरी हा उभा राहुन वाईट नजरेने पाहत असता फिर्यादीने त्यास हटकले असता आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354, 504 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि रेजीवाड मो.नं 9765837069 या करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 15 कि.मी. सावरगाव शिवार येथे दिनांक 21/11/2021 चे 20.15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– संदिप रामचंद्र सरवरे वय 30 वर्ष, रा. मसोरा तह.नरखेड हे विजय कांबळे रा. मसोरा यांचे एमएच– 40/ एल– 8269 क्रमांकाच्या ट्रेक्टर तसेच एमएच– 40/सि.ए– 3510 क्रमांकाच्या ट्रॉलीवर मजुरीचे काम करतात. आरोपी/मृतक नामे– नरेंद्र उर्फ पिंटु पांढुरंगजी राउत रा. मसोरा नरखेड हा ड्रायव्हर म्हणुन काम करतो. दि. 21/11/2021 रोजी रात्री 08.00 वा. गुणवंता बेलखेडे यांच्या दुकानातुन रोल पाईप ट्रेक्टरचे ट्रॉलीमध्ये भरून सावरगाव वरून मसोरा मार्गे जात असतांना यातील ट्रेक्टर भरधाव वेगाने हयगयिने व लापरवाईने चालविल्याने चालकाचा ताबा सुटला व ट्रेक्टर ट्रॉलीसह सावरगाव शिवारातील प्रकाश रेवतकर यांचे शेताचे समोरील शेतात रोडवरून खाली उतरल्याने फिर्यादी हे बाजुला फेकल्या गेले व चालकाच्या डोक्याला झाडाच्या फांदया लागल्याने ट्रेक्टर व ट्रॉली पलटी झाली. या अपघातात फिर्यादीच्या हाताला मार लागला असुन चालकाच्या डोक्याला जबर मार लागला असल्याने तो जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संदिप रामचंद्र सरवरे, वय 30 वर्ष, रा. मसोरा तह.नरखेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री जयपालसिंग गिरासे मो.क्र. 8355955538 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 06 कि.मी. अंतरावरील एमएच केएस पेट्रोलपंप दराडा एनएच 7 रोड येथे दिनांक 21/11/21 चे 11.30 वा. ते 11.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गणपत मोतीराम वंजारी, वय 30 वर्ष, रा. शिवनगर कन्हान हा आपली एमएच–40/एएच–1852 क्रमांकाची हिरो डिलक्स गाडीनी आपली भाची नामे– करीना राजाराम भुते, वय 18 वर्ष, रा. साठक, ता. पारशिवनी जि. नागपूर हीचे सोबत कन्हान वरून नागपुर रामटेक हायवे रोडनी साठक कडे जात असता यातील एमएच–40/सीडी– 3461 क्रमांकाच्या ट्रकचा चालक आरोपीने आपले ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला पाठीमागुन धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार फिर्यादीला डाव्या पायाला व कंबरेला मार लागला तसेच फिर्यादीची भाजी करिना हिला उजव्या पायाला डोक्याला पाठीला जबर मार लागल्याने ती गंभीर जखमी झाल्याने तिला उपचारा कामी उपजिल्हा रूगणालय कामठी येथे नेले असता डॉक्टरांनी तिला तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी हा ट्रक सोडून पसार झाला. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री सतिश मेश्राम मो.क्र. 9923798688 हे करीत आहे.

3) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 03 कि.मी. बोरुजवाडा येथे दिनांक 21/11/21 चे 20.15 वा. दरम्यान आरोपी एम.एच– 49/ए.एस.– 8854 क्रमांकाची मारोती सुजुकी एस–क्रास चा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून सायकल ला मागुन धडक दिली. या अपघातात सायकल स्वार मृतक नामे– शिवशंकर परसराम बन्साकर वय 30 वर्ष रा धनोरा जि. सिवनी ह.मु. चौदा मैल याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रविशंकर परसराम बन्सकार, वय 40 वर्ष, रा. धनोरा ता. धनोरा जि सिवनी म. प्र. यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री सागर कारंडे मो. न. 7722011228 हे करीत आहे.

4) पो.स्टे. मौदाः– अंतर्गत 10 कि.मी. वडोदा शिवार येथे दिनांक 21/11/2021 चे 15:01 वा. दरम्यान एमएच– 49/ ऐई– 4333 क्रमांकाची मारोती सुझुकी ॲर्टीका कारच्या चालक आरोपी/मृतक नामे– धनश्याम शंकरभाई पटेल, वय 65 वर्ष, रा. वाठोडा नागपूर याने आपले ताब्यातील वाहन कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने टर्निंग वरून त्याची कार उलटली. या अपघातात कार मध्ये बसलेले तीन इसमा मधुन दोन इसम नामे– अनिल जयंतीभाई पटेल, वय 65 वर्ष, रा. ईतवारी व शशिकांत भिखुभाई पटेल, वय 56 वर्ष, रा. छापरूनगर नागपूर हे जखमी झाले. तर आरोपी धनश्याम शंकरभाई पटेल, वय 65 वर्ष, रा. वाठोडा नागपूर याचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी पोलिस हवालदार गौतम मेश्राम यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतिश सोनेकर मो.क्र. 8975921770 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर